# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.06.2025** **वारःमंगळवार**

---

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान, पंतप्रधान कॅनडाला रवाना,

२.जिल्हानिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याच्या गृहमंत्री अमित शहा यांच्या मदतकार्य आयुक्तांना सूचना,

३. जनगणना आणि पहिल्यांदाच होणाऱ्या जातनिहाय जनगणनेची अधिसूचना जारी

४. राजकीय नेते, अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राज्यात विद्यार्थ्यांचा शाळाप्रवेश उत्साहात,

आणि

५. आदिवासींच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी धरती आबा लोकसहभाग मोहीम उपयुक्त ठरेल – मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

**<u>मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सायप्रसचा 'ग्रँड कोलार ऑफ दी ऑर्डर ऑफ दी मकारिओस थर्ड' हा सर्वोच्च नागरी सन्मान सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस क्रिस्टोडॉलिडेस यांनी काल प्रदान केला. सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृतज्ञता व्यक्त केली असून हा सर्व भारतवासीयांचा गौरव असल्याचं म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या रविवारपासून पाच दिवसांच्या सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर आहेत. सायप्रसचा दौरा आटोपून ते काल कॅनडाला रवाना झाले आहेत. तिथं ते जी७ देशांच्या परिषदेत सहभागी होणार आहेत.

**<u>अमित शहा</u>**

गेल्या दहा वर्षात भारतानं आपली कार्यक्षमता, वेग आणि अचूक व्यवस्थापन यांच्या बळावर आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मदतकार्य आयुक्त आणि आपत्ती प्रतिसाद दलांच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये बोलत होते. विविध प्रकारच्या संकटांमध्ये बचावकार्य करण्यासाठी जिल्हा पातळीवर आपत्ती व्यवस्थापन आराखडा असणं महत्त्वाचं आहे. त्यामुळे पुढच्या ९० दिवसात प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याच्या सूचनाही विविध राज्यांच्या मदतकार्य आयुक्तांना शहा यांनी दिल्या.

**<u>जनगणना</u>**

२०२७मध्ये होणाऱ्या जनगणनेची आणि पहिल्यांदाच होणाऱ्या जातनिहाय जनगणनेची अधिसूचना काल राजपत्रात प्रकाशित झाली. ही १६वी राष्ट्रीय जनगणना असून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची आठवी जनगणना आहे. देशभरात ३४ लाख प्रगणक आणि निरीक्षक, एक लाख तीन हजारांहून जास्त अधिकारी आधुनिक मोबाईल डिजिटल प्रणालीद्वारे या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. देशातल्या बर्फाळ प्रदेशात जनगणनेसाठी एक ऑक्टोबर २०२६ हा संदर्भ दिनांक निश्चित करण्यात आला आहे. तर उर्वरित देशात एक मार्च २०२७ हा संदर्भ दिनांक असेल.

**<u>इंट्रो</u>**

अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन येत्या २१ जून रोजी देशासह जगभरात अनेक ठिकाणी साजरा होणार आहे. या निमित्तानं आयोजित केलेल्या योग संगम उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावं असं आवाहन अभिनेते श्रेयस तळपदे यांनी केलं आहे-----------

**<u>बाईट–श्रेयस तळपदे</u>**

***मी योगा करायला सुरुवात केली आणि मला असं लक्षात आलं की हे सीरियसली काम करतो. म्हणजे माझा स्ट्रेस गेला, टेन्शन गेलं, माझा फोन ही बाजूला गेला. तर 21 तारखेला म्हणजे 21 जूनला आहे इंटरनॅशनल योगा डे. आणि आपले पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून आयुष मंत्रालय आणि आपले मराठमोळे केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकारातून येतोय एक योग संगम म्हणजे एकाच दिवशी एक लाख ठिकाणी एकाच वेळेला होणाऱ्या योग, संगम संपूर्ण देश करणार आहे योगा. त्यामुळे तुम्ही सुद्धा जिथे कुठे असाल तुमच्या टीम सोबत ऑफिस, शाळा, कॉलेज, सोसायटी सगळ्यांना एकत्र घ्या आणि योग करा आणि आयुष योगा पोर्टल वर सेल्फी काढून त्याची नोंदणी करायला विसरू नका.***

**<u>शाळाप्रवेश</u>**

विदर्भ वगळता राज्यात सर्वत्र कालपासून नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीनं अनेक शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचं स्वागत केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालघर जिल्ह्याच्या दुर्वेस इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचं स्वागत केलं आणि विद्यार्थी तसंच पालकांशी संवाद साधला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा जिल्ह्यात कोडोली इथं जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांचं स्वागत केलं.

तर उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दौंड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आलेगाव इथल्या शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचं पुष्प देऊन स्वागत केलं.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील तुंगणदिगर इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी फुगे, रांगोळ्या आणि पताकांनी बहुतांश शाळांचा परिसर सजवण्यात आला होता. शाळेच्या पहिल्याच दिवशी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकं, गणवेश, बुट, पायमोजे आदींचं वाटपही करण्यात आलं.

**<u>धरतीआबा</u>**

आदिवासींच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी हे धरती आबा अभियान एक चांगली संधी असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेसाठी ८० हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पालघर इथं केलं. पालघर जिल्ह्यातल्या मनोरमध्ये प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या ३२ जिल्ह्यातील पाच हजार गावांमध्ये हे अभियान राबवलं जाणार असून त्यामध्ये पालघर जिल्ह्यातल्या ६५४ गावांचा समावेश आहे. शासनाच्या १७ विविध विभागांच्या २५ योजना यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

**<u>निवड</u>**

सातार्‍यात होणार्‍या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची एकमतानं  निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी काल ही माहिती दिली..

**<u>पालखी</u>**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचं काल परभणी शहरात आगमन झालं. पालखीच्या मार्गावर ठिकठकाणी आरोग्य शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>देहू</u>**

जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पालखीचं प्रस्थान थोड्याच दिवसात होणार आहे; या सोहळ्यात भाविकांच्या सोयीसाठी आरोग्य विभागानं चार ठिकाणी बाह्यरुग्ण विभाग सुरू केले आहेत, अशी माहिती देहू प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर यादव आणि  डॉ. मेघा पडघने यांनी दिली.

**<u>अनुष्ठान</u>**

तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कार्यासंदर्भात असलेलं धार्मिक अनुष्ठान काल पूर्ण झालं. यावेळी होमहवन आणि अन्य धार्मिक विधी मंगलमय वातावरणात पार पडले

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं महिलांच्या क्रिकेट विश्वकरंडक  स्पर्धेच्या तारखांची घोषणा केली आहे. या स्पर्धेची सुरुवात येत्या ३० सप्टेंबर रोजी बेंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर होईल. स्पर्धेचा पहिला सामना भारत आणि श्रीलंका या दोन संघांमध्ये खेळला जाईल. या स्पर्धेची उपांत्य फेरी २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी होणार असून अंतिम सामना ०२ नोव्हेंबरला  होणार  आहे. तर  स्पर्धेतला बहुप्रतिक्षित भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना येत्या ०५ ऑक्टोबरला होणार आहे. हा सामना श्रीलंकेत आर. प्रेमदासा स्टेडियमवर दुपारी तीन  वाजता होणार आहे.

**इंट्रो-पावसाळीपर्यटन**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमळा इथं नुकत्याच झालेल्या पूल दुर्घटनेत चार पर्यटकांचा मृत्यू झाला; या दुर्घटनेनंतर पावसाळ्यातील पर्यटनाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. पावसाळ्यात पर्यटन करताना काय काळजी घ्यावी याविषयी गिर्यारोहक आणि पर्यटक हर्षल निकम यांनी आकाशवाणीशी बोलताना अधिक माहिती दिली....

***बाईट – हर्षल निकम***

*पावसाळी पर्यटन करत असताना हवामान खात्याच्या निर्देशाप्रमाणे सूचनांचं पालन करूनच आपण पावसाळी पर्यटनासाठी बाहेर जावं. पावसाळी पर्यटन करत असताना आपल्याबरोबर नेहमी सुरक्षिततेचे साधने म्हणजेच लाईफ जॅकेट दोरी शिट्टी फर्स्ट एड किट या सारखी सर्व साधने बरोबर ठेवावीत ज्या ठिकाणी धोकादायक फलक लावलेले असतील अशा ठिकाणी जाण्याचे टाळावे त्याचबरोबर डोंगराच्या कडेला भुसभुशीत ठिकाणी चिखलामध्ये जाण्याचे टाळावे खोल पाण्यामध्ये किंवा पाणी वाहत असलेल्या ठिकाणीसुद्धा आतमध्ये प्रवेश करू नये.*

पाऊस

राज्याच्या बहुतांश भागात कालही जोरदार पाऊस झाला.  कोल्हापूरमधील राधानगरी धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. 'भोगावती', 'पंचगंगा'  नद्यांच्या काठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झालं आहे. पंचगंगा नदीची पातळी वाढली असून राजाराम बंधारा पाण्याखाली गेला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात गेले तीन-चार दिवस मुसळधार पडत असलेल्या पावसाचा जोर काल काहीसा कमी झाला. जगबुडी, शास्त्री आणि कोदवली या तिन्ही नद्या अद्याप इशारा पातळीच्या वरूनच वाहत आहेत; मात्र त्यांची पाणीपातळी ओसरली आहे. या मुसळधार पावसामुळे रत्नागिरी जिल्ह्यात बरंच नुकसान  झालं आहे.रायगड जिल्ह्यातल्या आंबा आणि कुंडलिका नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे.

**हवामान–**

उद्या सकाळपर्यंत कोकणात बहुतांश ठिकाणी विशेषत: किनारपट्टी भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह अतिवृष्टीची शक्यता, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**